समाजाच्या उत्कर्षामध्ये शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण असते. अगदी पुरातन काळापासून शिक्षण हे एक सामाजिक परिवर्तनाचे साधन ठरले आहे. समाजाचा समतोल राखण्यासाठी स्त्री- पुरुष समानता अतिशय महत्त्वाची आहे. बी.एड अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी हे पदवी पूर्ण करून आलेले असतात. या विद्यार्थ्यांना बी.एड चा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर शिक्षक म्हणून देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका पार पाडायची असते. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी लिंगभाव समानतेबाबत जागरूक असणे अतिशय गरजेचे आहे

शाळेत अनेक उपक्रम राबविले जात असताना नकळत लिंगभाव भेद होतो. कौटुंबिक तसेच सामाजिक जीवनात देखील लिंगभाव असमानता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. देशाच्या एकूण लोकसंख्येत जवळजवळ निम्मा वाटा हा स्त्रियांचा आहे. त्यामुळे देशाच्या विकासासाठी या घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. स्त्रियांच्या सबलीकरणासाठी तसेच स्त्री शिक्षणासाठी अनेक कायदे,धोरणे व कलम, तरतूदी अस्तित्वात आहे. परंतु त्याबद्दल जागृती देखील आवश्यक आहे. याकरिता संशोधिकेने बी.एड शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये लिंगभाव समानता जागरूकतेसाठी उपक्रमाची निर्मिती व परिणामकारकता तपासणे हे संशोधन पूर्ण केले आहे.

**समस्या विधान:**

बी.एडच्या शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये लिंगभाव समानता जागरूकतेसाठी कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकता तपासणे.

**कार्यात्मक व्याख्या:**

1. **बी.एड शिक्षक प्रशिक्षणार्थी**

   सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी बी.एडच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेले विद्यार्थी.

2. **लिंगभाव समानता**

   स्त्रीलिंग व पुल्लिंग या जैविक आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता दिलेली समान वागणूक

3. **जागरूकता**

   लिंगभाव समानतेबाबतच्या कायदे व तरतूदींबाबतचे बी.एड छात्र शिक्षक प्रशिक्षणार्थींचे ज्ञान

4. **उपक्रम निर्मिती**

   लिंगभाव समानतेशी निगडित कायदे ,राज्यघटनेतील कलमे ,तरतूदी ,तसेच मूलभूत स्वातंत्र्यावर आधारित उपक्रम

**उद्दिष्ट्ये:**

१. बी .एडच्या शिक्षक प्रशिक्षणार्थींची लिंगभाव समानतेबाबाबतची जागरूकता जाणून घेणे .

२. बी .एडच्या शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये लिंगभाव समानतेबाबत जागरूकता निर्मितीसाठी उपक्रम निर्मिती करणे .

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II    MARCH – APRIL 2024

Original Research Article

३. बी .एडच्या शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये लिंगभाव समानतेबाबत जागरूकता निर्मितीसाठी निर्माण केलेल्या उपक्रमाची परिणामकारकता तपासणे .

**परिकल्पना:**

**शून्य परिकल्पना:**

बी.एड शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये लिंगभाव समानते बाबतच्या जागरूकतेसाठी तयार केलेल्या उपक्रमामुळे स्नेहवर्धक मंडळ सामाजिक व शैक्षणिक ट्रस्टच्या बी.एड महाविद्यालयातील बी.एड प्रथम वर्षाच्या शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या व पूर्व उत्तर चाचणीच्या मध्यमानातील गुणांमध्ये 0.05 स्तरावर सार्थ वाढ दिसून येणार नाही.

**संशोधन कार्यपद्धती:**

सदर संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा वापर करण्यात आला होता.

**जनसंख्या:**

पुणे जिल्ह्यातील बी.एड महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणारे सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थी ही जनसंख्या होती.

**न्यादर्श:**

सदर संशोधनासाठी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील तळेगाव दाभाडे येथील स्नेहवर्धक मंडळ सामाजिक व शैक्षणिक ट्रस्टच्या बी.एड महाविद्यालयातील प्रथम वर्षात शिकणाऱ्या तीस शिक्षक प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली होती.

**संशोधन अभिकल्प:**

सदर संशोधनासाठी एकल गट पूर्व उत्तर चाचणी अभिकल्पाची निवड करण्यात आली होती.

**संशोधनातील चल:**

**स्वाश्रयी चल:**

स्त्री- पुरुष समानतेबाबतचे कायदे व राज्यघटनेतील कलमे व तरतूदी यांची माहिती देणाऱ्या साधनांच्या साह्याने राबवलेला उपक्रम .

**आश्रयी चल:**

बी.एड शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये असलेली लिंगभाव समानतेबाबतची जागरूकता.

**माहिती संकलनाची साधने:**

- संशोधक निर्मित पूर्व व उत्तर चाचणी
- माहिती विश्लेषणाची साधने

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

- मध्यमान व प्रमाण विचलन

**व्याप्ती:**

१. सदर संशोधन हे प्रथम वर्ष बी .एड च्या सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थींसाठी उपयुक्त आहे.

२. सदर संशोधन हे बी .एड प्रथम वर्षाच्या पेपर क्रमांक १०२ मधील घटकांच्या अध्यापनासाठी उपयुक्त आहे .

**परिमर्यादा:**

१. सदर संशोधन हे पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील स्नेहवर्धक मंडळ सामाजिक व शैक्षणिक ट्रस्टच्या बी . एड महाविद्यालया पुरतेच मर्यादित आहे .

२. सदर संशोधन हे बी.एड प्रथम वर्षाच्याशिक्षक प्रशिक्षणार्थींपुरतेच मर्यादित आहे .

**संशोधनाची कार्यवाही:**

सर्वप्रथम शिक्षक प्रशिक्षणार्थींना लिंगभाव समानता जागरूकतेबाबतच्या प्रश्नाचा समावेश असणारी संशोधक निर्मित पूर्व चाचणी देण्यात आली . नंतर संशोधिकेने लिंगभाव समानता जागरूकता निर्मितीसाठी तयार केलेला उपक्रम विविध व्हिडिओ,पीपीटी,गटचर्चा यांच्या साह्याने राबविला व शिक्षक प्रशिक्षणार्थींना उत्तर चाचणी देण्यात आली .

**निष्कर्ष:**

पूर्व चाचणीच्या मध्यमांना पेक्षा उत्तर चाचणीचे मध्यमान अधिक होते त्यामुळे संशोधनाअंती शून्य परिकल्पनेचा त्याग करण्यात आला . त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये लिंगभाव जागरूकता निर्मितीसाठी तयार केलेला उपक्रम परिणामकारक ठरला .

**शिफारशी:**

१.सदर संशोधनाचा वापर उच्च माध्यमिक स्तरावर देखील करता येऊ शकतो.

२. सदर संशोधनाचा वापर बी . एड च्या इतर विषयांसाठी देखील करता येईल .

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. *पारसनीस ,ह .न . (२००८). शैक्षणिक संशोधन ओळख . नित्यनूतन प्रकाशन*

२. *भंगाळे ,शैलजा. (२०१५).समकालीन भारत आणि शिक्षण. प्रशांत पब्लिकेशन्स*

३. *भिंताडे वि . आणि सांगोलकर ,अ . (२०१५)समकालीन भारतीय शिक्षण लिंग आणि समाज .सुविचार प्रकाशन मंडळ*

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

४. तितरे प्र. बा. (२०२०). शाश्वत मानवी विकासाकरिता लैंगिक समानता. *OUR HERITAGE special issue on sustainable development, ISSN (Online): 0474-9030 Vol-68, Special Issue-5, https://vmbedu.in/upload/researchRecord/2_shatwat.pdf*

---

***Cite This Article:***

**प्रा . शेख आ. बा. (2024).** *बी.एडच्या शिक्षक प्रशिक्षणार्थींमध्ये लिंगभाव समानता जागरूकतेसाठी उपक्रमाची निर्मिती व परिणामकारकता.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 235–239). ERJ. **https://doi.org/10.5281/zenodo.10908165**